**Adv. PRASAD G. DAMALE.** **ॲड. प्रसाद ग. दामले.**

MAH 5036/07 B.A.,LL.B. बी.ए. एलएल.बी.

513A, Near G.J. College. Opposite District Court,
Tal. Dist. Ratnagiri - 415612
Cel : 9420908899 dprasad100@gmail.com]

५१३अ, गोगटे कॉलेज जवळ, जिल्हा
न्यायालयाशेजारी ता.जि. रत्नागिरी-४१५६१२
मोबा : ९४२०९०८८९९

**नोटीस**

**दिनांक : १३/०३/२०२०**

प्रति,

**१) श्री. चंद्रेश गुप्ता,**

**२) श्री. रोशन झा.**

अ.क्र.१ व २ द्वारा- द नॅशनल कन्झ्युमर को.ऑ.सोसायटी लि.

टी.एन.मेडीकल कॉलेज, डॉ.नायर रोड, मुंबई -०८

महोदय,

**१]** माझे अशील वार्ता ग्लोबल मिडीया, डी/एस/११, किनारा सोसायटी, ५२ बंगला एरीया, पनवेल - नवी मुंबई-महाराष्ट्र -४१०२०६, करीता अधिकृत प्रतिनिधी यांनी दिलेल्या माहितीवरुन व त्यांचे सांगणेवरुन आपणास नोटीस देतो की,

**२]** माझे अशील वार्ता ग्लोबल मेडीया हे, ''महाराष्ट्र वार्ता.कॉम'' या नावाने न्युज पोर्टल तसेच वृतांकन करण्याचे काम करतात. तुम्ही नोटीस घेणार क्र.१ व २ हे द नॅशनल कन्झ्युमर को.ऑ.सोसायटी लि., टी.एन.मेडीकल कॉलेज, नायर हॉस्पीटल येथील मेडीकल स्टोअर चे काम पहात आहात. तुमच्या मेडीकल स्टोअर मध्ये विक्री केली जाणारी विटामीन-डी-३, कॅलशीयम गोळ्या, मल्टीविटामीन, डायबीटीस ची औषधे इ. विक्री केली जाणारी औषधे दर्जाहीन असल्याबाबत माझे अशीलास माहिती मिळाली. माझे अशीलाने त्याबाबत तुमची प्रतिक्रीया घेणेचा प्रयत्न केला असता तुम्ही माझे अशीलास कोणतीही माहिती देणेस नकार दिला.

**३]** शनिवार दि. ७ मार्च २०२० रोजी सायंकाळी ६ वाजण्याचे सुमारस, तुमची प्रतिक्रीया घेणेसाठी वर नमुद पत्यावर माझे अशीलातर्फे प्रतिनीधी गेले होते. त्यावेळी माझे अशीलाचे प्रतिनिधीबरोबर तुम्ही वाद केलात तसेच कायदेशीरपणे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे

देणेसही तुम्ही नकार दिला. त्याच वेळी तुम्ही नोटीस घेणार क्र.१ व २ यांनी वार्ता ग्लोबल मिडीया प्रतिनिधी यांना ''तुम्ही हे सगळे पैशासाठी करत आहात'' असे बोलून कुठल्याही पुराव्याशिवाय माझे अशीलावर अतीशय गंभीर आरोप केले.

४] माझे अशील प्रामाणीकपणे वृतांकन करुन जनतेसमोर सत्यपरीस्थिती आणणेसाठी काम करत आहेत. मात्र तुम्ही माझे अशीलावर केलेल्या आरोपामुळे, जनमानसात माझे अशीलाचे विरुद्ध मत तयार होऊन, त्यामुळे माझे अशीलाची बदनामी झालेली आहे.

५] आपण केलेले सर्व आरोप खोटे आणि विना पुरावा आहेत. तरी सदर नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसात तुम्ही लेखी माफीनामा द्यावा.

६] तुम्ही लेखी माफीनामा न दिल्यास माझे अशील तुमच्याविरुद्ध बदनामी व अब्रुनुकसानी करीता रुपये ५ कोटी चा दिवाणी दावा तसेच फौजदारी स्वरुपाची कारवाई करणार आहेत याची गंभीरपणे नोंद घ्यावी. तसेच त्या कारवाईचे परिणामास व खर्चास तुम्ही जबाबदार रहाल याची नोंद घ्यावी. या नोटीसची एक प्रत पुढील कारवाईसाठी माझेकडे ठेवली आहे.

येणेप्रमाणे नोटीस आहे.

Adv. Prasad G. Damale Reg. No. MAH 5036/2007 Ratnagiri

ॲड.प्रसाद ग. दामले.